

# जलधि

## एक जीवन सागर खंड १

### शंतनु पाठक

Scanned by CamScanner

# ''जलधि''

एक जिवनसागर

खंड–१

– शंतनु शिवाजीराव पाठक
(B.SC.FY. नूतन महाविद्यालय सेलु)

सरस्वती प्रकाशन, वालूर



Scanned by CamScanner

''जलधि''
– शंतनु शिवाजीराव पाठक
शिवाजी गोविंदराव पाठक

लेखक :–
चि.शंतनु शिवाजीराव पाठक
''स्वरश्री'' ब्राम्हणगल्ली,
वालुर ता.सेलु जि.परभणी
भ्रमणध्वनी : ८६०५८१३८९१

प्रकाशक :
सरस्वती प्रकाशन
श्री शिवाजी गोविंदराव पाठक
''स्वरश्री'' ब्राम्हणगल्ली,
वालुर ता.सेलु जि.परभणी
भ्रमणध्वनी–९९२१४२०९०१

मुद्रक : श्री यशवंत निकम
श्री.वाल्मीकेश्वर प्रिंटर्स वालुर
ता.सेलु जि.परभणी

मुखपृष्ठ : कु.कल्याणी शिवाजीराव पाठक
वालुर. भ्रमणध्वनी–७७७५०३७६२९

आवृत्ती :–१ प्रकाशन दि. २०/११/२०१८

मुल्य रू. ४०/–



Scanned by CamScanner



## ।। जय बजरंगबली ।।



Scanned by CamScanner



।। श्री संत ज्ञानेश्वर माऊली महाराज ।।



।। श्री प.पु.स.स.चिंतामणी महाराज ।।



Scanned by CamScanner

# "जलधि"

प्रकाशकाचे मनोगत...श्री शिवाजीराव पाठक/०६
प्रस्तावना.....प्राचार्य डॉ.विनायकराव कोठेकर/०७
मनोगत ......... प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी /०९
जलधि...चि.शंतनु पाठक /१०
गुरूमाऊली......कु.कल्याणी पाठक/२९
परिशिष्ठ/३०
पसायदान/३१



Scanned by CamScanner

# प्रकाशकाचे मनोगत

– श्री. शिवाजीराव पाठक

**''गुरूवीण अनुभव कैसा कळे''** किंवा गुरूबिन कौन बतावे बाट संत ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील ओवी असो की संत कबीराचे दोहे असो, मनुष्य जन्माला आल्यानंतर त्याला या ब्रम्हांडाचा अनुभव येण्यासाठी किंवा माणसाला जगाची खरी वाट दाखवणारा हा गुरूंच.

मनुष्याला खरा अनुभव देणारा हा गुरूच आहे. हे ज्ञानेश्वरांचे बोल शांतीब्रम्ह एकनाथ महाराज यांनी ते अनुभवले व त्यावर अभ्यास केला. त्यात त्यांना हे कळुन चुकले, की गुरूंच का? तर मनुष्याला देवाची भेट होणे अत्यंत कठीण. मग मनुष्याला मार्ग कोण बरं दाखवणार ? तर नाथानां हे दिसले की 'गुरू परमात्मा परेशु'.येथे परेशु म्हणजे परमेश्वर. मनुष्याला मार्ग दाखविणारा फक्त परमेश्वर असतो. आणि पृथ्वीवर तो गुरूच्या स्वरूपात अवतार होतो. म्हणुन सर्व संत मांदीयाळी हेच सांगते की, **''एतत्सर्वगुरोर्भक्त्या''** म्हणजेच गुरूची भक्ती.

गुरूला ज्ञानाचा सागर असे समजून ''जलधी'' हा ग्रंथ चि.शंतनुने निर्माण केला. आपल्यासमोर जलधिचा केवळ पहिला खंड प्रकाशात येत आहे. आणखी दोन जलधि खंड भविष्यात प्रकाशित होतील. या ग्रंथामध्ये गुरू व शिष्य या बद्दल विवेचन आहे. दुसऱ्या खंडामध्ये ज्ञान व विज्ञान याबद्दल व तिसऱ्या खंडामध्ये योग.

असा हा ''ज्ञान–जलधि'' म्हणजे गुरू व शिष्य यांची सांगड घालणारा ग्रंथ वाचकांच्या मनावर बिंबावा व अनेक गुरू–शिष्य परंपरा निर्माण व्हाव्यात व हा ग्रंथ उत्तरोत्तर वाचकांच्या जीवनावर परिणाम करणारा असेल. अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो, व शंतनूस शुभाशिर्वाद.

यासाठी मदत करणाऱ्यांचे मी मनस्वी या मनोगतातून आभार मानतो. त्यामध्ये संगणककाम, मुख पृष्ठ रचना प्रकाशक म्हणुन मला मदत करणारे सर्व लोक यांचे मनापासुन आभार.

।। श्री गुरूवे नमः ।।

(शिवाजी गोविंदराव पाठक)



Scanned by CamScanner

# प्रस्तावना

जलधी या कुतुहलाच्या शब्दामुळे शंतनु पाठक यांचे पुस्तक वाचले.चिंतनपर स्वरूपातील या सृजनास मनःपुर्वक शुभेच्छा. या पुस्ताकाच्या शेवटी लेखकाने "जलधीचे एक पुष्प या एका खंडातुन सद्‌गुरू चरणी अर्पन करतो", ही भावना व्यक्त करताना, लेखकाला सद्‌गुरूविषयी आणखी बरेच सांगावयाचे आहे याची जाणीव होते. त्यांचा पुढचा लेखन प्रवास असाच सातत्यपुर्ण राहो. ही प्रभुचरणी प्रार्थना. वास्तविक प्रस्तुत लेखक माझ्याच संस्थेच्या महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. त्याचे वय लक्षात घेता, त्याचा या क्षेत्रातील अभ्यास व विषयाची मांडणी उच्च पातळीची असल्याचे जाणवते. अध्यात्मिक चिंतनाचा वयाशी संबंध नसतो हेच खरे. अर्थात यामध्ये पूर्वसुकृत व कौटुंबिक संस्कार महत्वाचे घटक ठरतात.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात **'कुळी कन्यापुत्र होती जे सात्विक । तयाचा हरिख वाटे देवा ।।'** या उक्तीप्रमाणे कुळामध्ये सात्विक वृत्तीचा उदय झाला तर त्या कुळास पवित्रता येते. आपण कोणत्याही पालकास विचारले की तुमचा मुलगा काय होणार तर उत्तर मिळते की तो डॉक्टर किंवा इंजिनियर होणार. माझ्या मुलाने अध्यात्माच्या क्षेत्रात चिंतन करावे, त्याने प्रवचन,किर्तन करावे असे कोणास वाटत नाही. या पार्श्वभूमिवर विचार केला तर या कुटूंबाने मात्र आपल्या मुलाच्या अध्यात्मिक क्षेत्रातील अभ्यासाला प्रोत्साहन दिल्याचे दिसुन येते. याचे कारण शोधले असता प्रस्तुत लेखकासह तीन पिढ्या आपल्या समोर येतात. याचे आजोबा व वडील यांच्या संस्कारातून हा अध्यात्मिक विचाराचा प्रवाह प्रस्तुत लेखकापर्यंत आल्याचे दिसून येते व **''कुळी कन्यापुत्र होती हे सात्विक याचे प्रत्यंतर येते''**

गुरू,शिष्य, गुरू–शिष्य संबंध याचे विवेचन प्रश्नाच्या माध्यमातुन केले आहे. ज्ञान प्राप्त करण्याचा हा मार्ग श्रीमद् भगवद्‌गीते मध्ये चौथ्या अध्यायात भगवंताने सांगितला आहे. **'तद्विध्दि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।'** म्हणजे तत्वाला जाणणाऱ्या ज्ञानी पुरूषांकडुन, त्यांना प्रणाम करून,सेवा करून,निष्कपट भावाने प्रश्न विचारून, ज्ञान करून घे. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात **ते ज्ञान पै गा बरवे । तरी मनी अथि आणावे । तरी संता या भजावे । सर्वस्वेसी । जे ज्ञानाचा कुरूठा । तेथ सेवा हा दारवंटा । तो स्वाधीन करी सुभटा । ओळगोनी ।। तरी तनु मनु जीवे । चरणासी लागावे । आणि अगर्वता करावे । दास्य सकळ ।। मग अपेक्षित ते आपुले । तेही सांगती पुसिले । जेणे अंतःकरण बोधले । संकल्पा न ये ।।**



Scanned by CamScanner

प्रस्तुत लेखकाने आज पावतो त्याच्या संपर्कात आलेल्या अध्यात्माच्या क्षेत्रातील अधिकारी व्यक्ती कडून श्रवण केलेल्या ज्ञाना मुळे, त्याच्या अंतःकरणास जो बोध झाला त्या आधारावर मनात निर्माण झालेले,गुरू-शिष्य तसेच त्यांचा परस्पर संबंध या बाबतच्या प्रश्नाची उत्तरे शोधल्याचे जाणवते

।।ध्यान मूलम् गुरूमुर्ती ।। या सगुण रूपा पासुन ।। अखंड मंडलाकार ।। गुरूच्या या निर्गुण निराकार रूपाचे आकलन लेखकाला बालपणा पासून लाभलेला संत सहवास, तसेच कुटूंबातील सात्विक संस्कार या मुळेच ते शक्य झाले असावे.

सद्गुरू संदर्भात विचेन करताना गुरू म्हणजेच परमात्मा होय असे प्रतिपादन केलेल आहे. ज्ञानेश्वर माऊलीने गुरूला देवत्व दिलेले आहेत ते म्हणतात

**गुरू हा संत कुळीचा राजा ।**
**गुरू हा प्राणविसावा माझा ।।**
**गुरूविण 'देव' दुजा**
**पाहता नाही त्रिलोकी ।।**
**संत एकनाथ महाराज सांगतात गुरू परमात्मा परेशू ।।**

अशा सद्गुरूला **'जलधि '** म्हणजे समुद्राची उपमा देण्याचे कारणही विस्ताराने नमुद केले आहे. लेखक विज्ञानाचा विद्यार्थी असल्यामुळे, विज्ञान व अध्यात्माची सांगड घलण्याचा प्रयत्न देखील केलेला आहे. गणितात एक सिध्दांत आहे, की रेषा व संख्या अनंत आहेत. तर अध्यात्माचे प्रतिपादन आहे की ब्रम्हांड व ज्ञान अनंत आहे. ब्रम्हांडाचा संबंध तसा खगोल शास्त्राशी देखील येतो. उर्जेच्या संदर्भात एक संदर्भ दिला तो, मन व बुध्दिच्या संदर्भात आहे. बुध्दी ही स्थिर असल्यामुळे तेथे उर्जा साठुन राहते. मन हे चंचल आहे. म्हणुन जेथे मन व बुध्दीचे व्दंव्द असेल तेथे बुध्दीचे ऐकावे मनाचे नाही. बुध्दीचे ऐणारा स्थितप्रज्ञ असतो व त्याची गुरूवरची निष्ठा अढळ असते.

अशा अनेक विषयावरील विचारांना चालना देणारा हा ग्रंथ वाचकांच्या चिंतन प्रक्रियेत उपयुक्त ठरेल असा दृढविश्वास व्यक्त करत, पुन्हा एकदा लेखकाचे अभिनंदन व अगामी लिखाणास अंतःकरणपूर्वक शुभेच्छा.

**डॉ.विनायक कोठेकर**
सेवानिवृत्त प्रचार्य, सहसचिव
नूतन विद्यालय शिक्षण संस्था सेलु.



Scanned by CamScanner

# मनोगत-प्राचार्यांचे

**- प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी**

विश्वात अतिप्राचीन संस्कृतीमध्ये भारतीय संस्कृतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. असे म्हणतात, की कोणत्याही देशाला त्याच्या संस्कृतीवरून ओळखता येते. भारतदेशात असलेल्या विविधतेमुळे आल्या देशाची संस्कृतीही वैविध्यपुर्ण आहे. भारतीय संस्कृतीचा मूलाधार म्हणजे वेद, पुराणे,शास्त्रे,भगवत्गीता इ.होत. भारतीय संस्कृतीध्ये **'कर्मयोग'** आणि **'ज्ञानयोग'** ही दोन स्त्रोते आहेत.

**'' परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे''** या अनुषंगाने काळानुरूप समाज बदलत गेला आणि त्याचबरोबर कर्मयोग आणि ज्ञानयोगही बदलत गेला. आज शिक्षणाची दशा व दिशा यांची अवस्था दयनीय असल्याचे चित्र आपणांसमोर दिसते आहे. या विषयी राज्य,राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा इ.होऊनही अपेक्षित बदल साधण्यात आपण निरंतर अपयशी ठरतो आहोत.

अस्वस्थ, गोंधळलेल्या समाजमनाला आज योग्य दिशादर्शनाची नितांत गरज आहे. तसेच याची पुर्तता केवळ सर्वज्ञानसंपन्न गुरूच्या माध्यमातून होऊ शकते. असा गुरू ज्ञानयोगाच्या माध्यमातुन शिष्याची, पर्यायाने सामाजिक उन्नती साधतो.

'जलधि' हा ग्रंथ पाठक शंतनु शिवाजीराव याने लिहिलेला आहे आणि तो आपणास गुरु,शिष्य संबंध इ.च्या माध्यमातून शिक्षणक्षेत्रातील उणिवांना दूर करून नव समाज निर्मितीसाठी निश्चितच सहाय्यक ठरेल यात तिळमात्र शंका नाही. मी चि.पाठक शंतनु यास या ग्रंथासाठी अभिनंदन व पुढील लेखनकार्यासाठी शुभेच्छा देतो !

**- प्राचार्य श्री मा.डॉ.शरद कुलकर्णी**
**(प्राचार्य नूतन महाविद्यालय, सेलु)**



Scanned by CamScanner

# ''जलधि''

**''अपार भरला हा दुःखनिधी ।**
**काढी यातुनी आधी, बुडतो यात कसा ।**
**बघणारे, बघुनी ते हसणारे, कोणी नच येती**
**मम सहाय्या, तुजविण सद्गुरूराया ।।**
**येई झडकरी बा ।''**

हा धावा तुम्ही कुठेतरी ऐकल्यासारखा वाटेल. तर हा धावा सद्गुरूंना केलेला आहे. परंतु हा धावा का करावा लागतो? तर सद्गुरूच आहे, जो या भवसागरातुन मनुष्यास तारु शकतो. कलियुग हे सर्व पापाचे प्रतिक आहे. तसेच या कलियुगातील जीवन हे भवाचे प्रतिक आहे. जे काम क्रोध,लोभ,दंभ,मोह यांसारख्या कुटील विकारांनी भरले आहे. जणु काही हा पापाचा समुद्रच आहे ! जरा, पीडा,रोग,व्याधी इत्यादींनी व्याप्त हा देह आहे आणि या ही पलिकडे जावे तितके ते वाढतच जातात. परंतु एक सत्य मात्र आहे की, या शरीर बंदीशाळेत वास करणारा आत्मा मात्र 'चिदानंद ' आहे. परंतु कलियुगात पाप एवढे प्रबळ आहे की, साधक या आत्मरूपी परमात्म्याला ओळखण्यात असमर्थ आहे. हा साधक किंवा मी स्वतःलाच साधक म्हणेल तर मी या भवसागरात बुडत चाललेलो आहे.

मला या समुद्राला किनाराच सापडत नाही. मला खुप वाटतय की सारे विश्व, सारं ज्ञान समोर दिसणारा दीर्घ युगान्त, हे सारं माझ्या मुठीत असाव. पण जेंव्हा मी त्या सर्वांना मुठीत बांधण्याचा प्रयत्न करतो, तेंव्हा ते मृगजळासारखे क्षणार्धात माझ्या विचारांपासुन लुप्त होतात. यांवर मला एक कविता सुचते.

**मी शोधितो किणारा, विचार सागराला ।।धृ।।**
**वाटते साठवावे, हातात नभ अनादी ।**
**क्षणात गोठवावे, हे युग बहु प्रमादी ।।**
**मुठीत साठवावे, प्रदीर्घ अनंताला ।।१।।**
**समीप तो युगान्त, मज दिसे अकस्मात ।**
**जाता समक्ष होई, तो लुप्त क्षणार्धात ।**



Scanned by CamScanner

जाणेल का कधि मी, भंगुर मृगजळाला ।।२।।

या प्रमाणे मला, म्हणजेच एका साधकाला अनेकानेक जटील प्रश्नांनी ग्रासलेले असते आणि या प्रश्नाची उत्तरे शोधण्याचा मार्ग म्हणजेच जीवन आहे. परंतु हे प्रश्न सहजासहजी सुटत नाहीत. कारण प्रत्येक प्रश्न असे आणखी प्रश्न घेऊन येतो आणि मग या प्रश्नांना तोंड द्यावयाचे सोडुन आलेल्या अनेक प्रश्नांना तोंड देत बसावे लागते. याचेच नाव 'भव' आहे. हे भवाने व्याप्त प्रश्न अतिशय जटील असतात. म्हणुन वरचा धावा करावा लागतो, की जगातील असा कोणीही नाही जो या भवसागरातून साधकाला पार करवेल तो केवळ एकच आहे.

अनंतसंसारसमुद्रतार ।

नौकायिताभ्याम स्थिरभक्तीदाभ्याम ।

जाड्यब्धिसंशोधन, वाडवाभ्याम ।

नमो नमः श्री गुरूपादुकाभ्याम ।।''

म्हणजेच, अशी एकच जागा आहे, जी या जीवन भवसागरातून मानवाला पार नेऊ शकेल. ती म्हणजे गुरूचरण. जो पर्यंत गुरूचरणांना पकडुन साधक भक्तीपुर्ण अंतःकरणातुन गुरूला संपुर्ण शरण जात नाही, तो पर्यंत त्याचा या संसारसागरातुन उध्दार नाही. यावर श्री गुरू अष्टकात सांगितले आहे की,

''शरीरं, सुरूपं,तथा वा कलत्रं ।

यशः चारुछिन्न धनम मेरूतुल्यम् ।

मनः चेन्न लग्नं गुरौरंध्रिपदमे ।

ततः की, ततः की ततः कीं ।।''

शरीर सुंदर आहे, बायको चांगली आहे, तसेच सर्व क्षेत्रात सर्व बाजुंनी यश आहे. तरीही हे मानवा ऐक जोपर्यंत गुरूचरणांबरोबर तुझे मन एकरूप होणार नाही. तोपर्यंत कळणार नाही की, "चिदानंदरूपं । शिवोडहं शिवो हं" । किंवा "देह देवाचे मंदिर, आत आत्मा परमेश्वर" । यासाठीच आपल्या सर्व कलियुगातील साधकांना गुरूभक्ती कशी श्रेष्ठ साधन आहे हे सांगण्यासाठीच माझ्या अल्पमतीप्रमाणे हा ग्रंथ लिहीत आहे. माझे वचन आहे या ग्रंथातुन आपल्याला गुरूभक्ती कळेलचं! कारण गुरूभक्ती ही अशी सुधा आहे. जी जितकी प्यावी तितकी प्यावीच वाटेल. म्हणुन हा



Scanned by CamScanner

ग्रंथ ज्याचे हे पहिले पुष्प आपण अभ्यासावे व गुरूभक्तीचे आचरण करावे, कारण स्वामीकाज गुरूभक्ती ।.............हीच विष्णुची महापूजा । अनुभव नाही दुजा असे तुकोबा आपल्याला सांगतात. या सर्व कथनांसाठी एक दृष्टांत देतो म्हणजे गुरूभक्तीकडे आपली ओढ वाढेल व ग्रंथ समजण्यास सोपा जाईल.

सुमारे ७५० वर्षापुर्वी पैठण शहरात मार्तंड जोशी नावाचा एक विद्वान ज्योतीषी राहत होता सर्व विद्यांत त्याची गति होती. ब्राम्हण असून त्याला त्याच्या पत्निपासुन सहदेव नावाचा पुत्र झाला. सहदेव लहाणपणापासुनच वडीलांकडे ज्योतिषविद्या शिकत होता, परंतु शिकत असताना त्याच्या वडीलांचा देहांत झाला व त्याला अतीव दुःख झाले आणि त्याला जी त्रिलोकज्ञान विद्या शिकायची होती ती तो शिकू शकला नाही. परंतु सहदेव धिराचा. दुःख करत बसण्यापेक्षा प्रयत्न करून एखादा गुरू आपण प्राप्त करावा व त्यांकडुन ही विद्या संपादन करावी असे ठरविले.

पैठण शहरात एक साधुपुरूष राहत असे. सहदेव त्यांच्याकडे गेला व नम्रपणे म्हणाला '' महाराज आपण मला शिष्य करून उपकृत करावे'' साधुपुरूष त्याच्या नम्रपणाने संतुष्ट झाले व म्हणाले '' बालका तुझी ईच्छा उत्तम आहे; परंतु मला स्वतःलाच ही विद्या अवगत नाही. ती माझ्या गुरूंना अवगत होती. म्हणुन तु गावातील स्मशानभुमीतील मोठ्या लिंबाच्या झाडाखाली माझ्या गुरूंची समाधी उकर व गुरूंची कवटी काढुन ती रोज थोडी–थोडी उगाळुन पी त्याने तुला विद्या प्राप्त होईल. सहदेवाचे प्रयत्न आता पुढे पहा. त्याने एकच मनात धरले

**"ज्ञानाचा तो एक गूरूच त्वष्टा ।**
**ठेवा तयावरी निष्ठा ।**
**गुरूभक्तीची पराकाष्ठा ।**
**एकलव्याचिएपरी ।।"**



Scanned by CamScanner

सहदेव सत्पुरूषाच्या म्हणन्याप्रमाणे करू लागला व त्याला हळुहळु त्याला त्रिलोकज्ञान विद्या प्राप्त होऊ लागली..

यावरून असे लक्षात येते की, जर केवळ तो गुरूच्या कवटीच्या सारातुन ही विद्या घेऊ शकत असेल तर स्वतः गुरूत किती सामर्थ्य असेल. म्हणुनच या अशा दैविशक्तिबद्दल लिहीत आहे. परमात्मा प्राप्त करून देणारा गरु हा काय आहे हे जाणुन घेऊन मी ते आपणा समोर जलधितून मांडण्याचा प्रयत्न करत आहे. तरी आपण जलधितुन प्रवास करवाचं एकदा!

**'जलधि'** चा अर्थ आहे समुद्र. हे आधिच यासाठी सांगितले की, या पुस्तकात मी गुरूला जलधि म्हणजे ज्ञानाचा समुद्र असे संबोधले आहे. आता 'ज्ञानाचा समुद्र' असे संबोधन यासाठी, की जसा समुद्र अनंत असून सुध्दा मर्यादित आहे. त्याच प्रमाणे गुरूला जर कोणी व्यक्तिपुरूष समजत असेल, तर त्याने असे समजावे की, गुरूचे शरीर जरी जीवननियमांनुसार मर्यादित असेल तरी त्याकडील ज्ञान हे समुद्रातील अथांग पाण्यासारखे असते. जरी मर्यादित असेल तरी त्याचे मोजमाप करणे एका काणासाठी अशक्य आहे.

या गोष्टीचा विचार करता करता मला गणित व अध्यात्म यांची सांगड घालाविशी वाटते. गणित सांगते की, रेषा, संख्या अनंत आहेत व अध्यात्म सांगते की ब्रम्हांड व ज्ञान अनंत आहे. या दोन्हीवरून एक निष्कर्ष काढल्यास लक्षात येते की, रेषा, संख्या,ब्रम्हांड व ज्ञान अनंत आहेत.

या गोष्टीची तुलना मी आपल्या जीवनाशी केली व मला असे दिसून आले की, जीवन रेषेप्रमाणे आहे. त्यातील प्रत्ये टप्पा संख्येप्रमाणे आहे भूत,भविष्य व वर्तमान हे ब्रम्हांडाप्रमाणे आहेत ज्यांचा थांग लागत नाही. याचाच अर्थ ज्याप्रमाणे या गोष्टी अनंत आहेत, जीवनसुध्दा मर्यादित परंतु अनंत असायलाच हवे. म्हणून मी गुरूला मागे अनंत परंतु मर्यादित असे संबोधले.

आता गुरू व शिष्य या दोघांचा विचार करताना माझ्यासमोर खालील सात प्रश्न पडले ज्यांची उत्तरे शोधणे हे पुस्तक लिहीण्यामागील सर्वात मोठे कारण आहे. हे प्रश्न खालील प्रमाणे आहेत.

१) गुरू काय आहे?



Scanned by CamScanner

२) गुरूकडील ज्ञानाचे रहस्य काय?

३) गुरूकडील ज्ञान शिष्याने कसे घ्यावे?

४) गुरूला कसा शिष्य प्रिय आहे ?

५) योग्य शिष्य व गुरू यांचा शिक्षक व विद्यार्थी असा संबध कसा?

६) 'जलधि' म्हणजे काय ?

यातील सातवा प्रश्न 'जलधि' म्हणजे काय हा मला या अर्थी पडला की, मी गुरूला जलधि म्हटले. मग आता जलधि हे संबोधन योग्य आहे का ? आणि माझ्या समोर गुरू ही concept आल्यानंतर समुद्रच का उभा राहतो. या सर्वांचा विचार करताना मी विचार सागरात एवढा तुडूंब बुडत गेलो, की वेगवेगळे प्रश्न मला भंजाळून टाकत आहेत.

ग्रंथ लिहित असताना एक श्लोक सुरूवातीला डोळ्यापुढे आला.

**ध्यानमूलम् गुरूर्मुर्ती ।**
**पुजामुलम् गुरूर्पादंम् ।।**
**मत्रमुलम् गुरूर्वाक्यम् ।**
**मोक्षमुलम् गुरूर्कृपा ।।**

या श्लोकाच्या अग्रपंक्तीनेच ग्रंथ कसा लिहू याबाबत शिकविले की, अनंताला बांधायचे असेल तर वैदिक गणित सांगते त्याप्रमाणे अव्याख्यायाला अव्याख्यायाने भागले तरच उत्तर येते अन्यथा उत्तर अव्याख्येयच राहते म्हणुन अनंत गुरूला विचारांमध्ये बांधण्यासाठी त्याच्याच मुर्तीचे ध्यान करावे लागेल, त्याच्याच पायाचे पूजन करावे लागेल व त्याचे वाक्य हे एका मंत्राप्रमाणे घेऊन त्याचे चिंतन करावे लागेल तर आणि तरच त्या गुरूची कृपा होईल व गुरू कळेल आणि एवढे सगळे करणे एका कलियुगी मानवासाठी अशक्यपद आहे. कारण ही एक मोठी अडचन आहे. आणि आपण ध्यान या बाबीशी खुपच अनभिज्ञ आहोत. परंतु आपण बुध्दीमान तर आहोत आणि एक कोणी असे म्हणतो

"Intelligency is the policy, that is the adjustment in new situation " म्हणुन नवीन अडचणींना न घाबरता मी गुरूचे ज्ञान समजुन घेण्यासाठी मी गुरूचे ध्यान लावण्यास सुरूवात केली. जसे–जसे हे ध्यान गंभीरता



Scanned by CamScanner

घेत होते तसे–तसे मला विविध आवाज आले ''अहं ब्रम्हाऽस्मि'' ''अहं मनुजोऽस्मि'' ''अहं पशुःआस्मा'' ''अहं किटकोऽस्मि'' आणि ''अहं वृक्षोऽस्मि'' या आवाजांना एकताच मी विचलित झालो व ज्ञान तुटले. नंतर खुप विचार केल्यानंतर माझ्या लक्षात आले, की हा माझ्या गुरूचाच साद असावा जो मला सांगत आहे की, मी वेगवेगळ्या अवस्थापासुन निर्माण झालेलो आहे.

केवळ पाच तत्वांनी बनलेले हे मानवी शरीरच मी नाही तर अनेक योनी जसे,किटक,पशु,वृक्ष आणि इत्यादी मधून माझे जीवन यापन झालेले आहे, आणि एवढे सगळे असुनही मी ब्रम्ह म्हणजेच परमात्मा आहे, आणि परमात्मा तर अनंत आहे आणि या अनंत परमात्म्याचाच मी एक भाग आहे याचे प्रमाण म्हणजे–

**''ममैवांशो जीवनलोके जीवभुतः सनातनः । मनः शष्ठानि इंद्रीयाणि प्रकृतिस्थानकर्षति''** ।। श्रीमद् भगवद्गीता अध्याय पंधरावा अर्थात् सर्व जीवांमधील सनातन असा असलेला आत्मा हा परमात्माच आहे. म्हणजे आता मला स्व चे ज्ञान झाले स्व चे ज्ञान झाल्यानंतर पुन्हा गहन प्रश्नामध्ये बुडत गेले तेव्हा मला एक श्लोक आठवला.

**'' अखंड मंडलकार,।**
**व्याप्तं येन चराचरम,।**
**तत्पादस्पर्शितम् येन ।**
**तस्मै श्री गुरूवे नमः ।।''**

हा गुरूपरंपरेचा श्लोक मला सांगत होता, की ज्या गुरूचे ध्यान तु लावत आहेत तो निर्गुण निराकार आहे व चराचरामध्ये व्याप्त झालेला आहे व तोच परमात्माशक्ती आहे. अशा गुरूला तु शरण जा।

या सगळ्यामुळे माझ्या लक्षात आले की, गुरूच परमात्मा आहे, अखंड अनंत आहे आणि तो व्यक्तीरूप नसुन शक्तीरूप आहे. म्हणुन एका कोणी व्यक्तिने गुरूला व्यक्तिरूप न समजता शक्तिरूप समाजावे परंतु शक्तिरूप जर समजले, तर मग भगवद्गीतेत जसे सांगितले की, **''क्लेशोधिकस्तरषामव्यक्तासक्तचेतसाम, अव्यक्ताहीगर्तिदुःख देहवभीरवाप्यते''** म्हणजेच निराकाराची उपासना ही अतिशय क्लेशदायक असते. मग आता प्रश्न असा निर्माण होतो की गुरूला काय समाजावे? तसेच गुरूकडील ज्ञानाचे जे रहस्य आहे ते कसे उलगडेल?



Scanned by CamScanner

या सर्वाचे विचार मला खुप भंजाळुन टाकत होते आणि मुख्य प्रश्न न सुटता दुसरेच प्रश्न मला परेशान करत होते. या सर्वांमध्ये मला पुन्हा हे आठवले की, ज्या गुरूमध्ये आपण ध्यान लावत आहोत त्यापासुनच हे सर्व प्रश्न निर्माण होत आहेत. म्हणजेच गुरूंच जीवनातील सर्व प्रश्नाचे अग्रगण्य किंवा उगमस्थान आहे. म्हणुन विचारांचा आदी किंवा जीवनसागराचे उगमस्थान गुरूच आहेत.

आता माझ्या लक्षात आले की मी जर गुरूला मुळ धरले तर या जीवन वृक्षाच्या टोकापर्यंत मला पोहचता येईल. मग आता जीवनाचा मुळ म्हणजे गुरू हे माझ्या लक्षात आले. आता पुढे काय, तर आता मी जीवनाचा मध्य व जीवनाचा अंत या बाबत विचार करण्यास सुरूवात केली व त्यात आढळुन आले की, जीवन जगण्याचे ज्ञान देणारा गुरूच आहे मृत्यु व त्यानंतरचे रहस्य काय हे सुध्दा एक गुरूच सांगु शकतो. म्हणुन माझ्या लक्षात आले की, जीवनाची सुरूवात मध्य तसेच शेवट गुरूच आहे. म्हणजेच पुर्ण जगच गुरू आहे. आता एक एक गोष्ट गुरूविषयी माझ्या समोर येत होती त्यामुळे ज्यामुळे गुरूचा सखोल अभ्यास करणे शक्य होत होते.

आपण सर्वजण पराप्रकृतीमध्ये सहत आहोत कारण पराप्रकृती म्हणजे ज्यामध्ये प्रत्येकाला 'स्व' म्हणजे शरीर असे वाटुन त्यावर अहंकार असतो आणि याउलट एक योगी मनुष्य हा अपरा–प्रकृतीत जगत असतो, जेथे मनुष्याला परमेश्वराचे ज्ञान तथा अनुभूती झालेली असते व तो स्वतःचा अर्थ 'परम' असा घेतो कारण आत्मा म्हणजेच परमात्मा याचे ज्ञान त्याला झालेले असते.

परंतु एक गुरू हा परा आणि अपरा या दोहोंच्या पलीकडे आहे. तो स्वतःच परमात्मा आहे आणि त्यामुळे जसे भगवद्गीतेत सांगितले त्याप्रमाणे तो जीवनाआधीही होता, तो आताही आहे आणि तो अखंड, अनंत काळापर्यंत असणार आहे.

**''बीज मां सवभूतानां ।**
**विधि पार्थ सनातनम् ।**
**बुद्धिर्वूद्धिमतामस्मि**
**तेजस्तेजस्विनामहम् ।।**
**(श्रीमद्‌भगवद्‌गीता)**



Scanned by CamScanner

याचाच अर्थ सर्व जीवनाचे बीज,मुळ जीवनातील तेज तसेच जीवन संपल्यानंतरही गुरू आहेत. मग अशा गुरूकडील ज्ञान कसे बरे असेले या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, ज्ञान हे गुरुकडे नसुन गुरूच ज्ञानाचे उगमस्थान आहे.

कारण,

**''मय्याध्येक्षेण प्रकृतिःसुयते सचरायच''** याचाच अर्थ की गुरूच्या आज्ञेने सर्व जगातील ज्ञानाचा उगम होतो. म्हणजेच हे सर्व ज्ञान गुढ अनादी अखंड अनावर्त असले पाहिजे म्हणुन मी ज्या ज्या गोष्टींची जीवनाशी तुलना केली होती त्या सर्व गोष्टी जसे रेषा,जीवन,संख्या जीवनाचे टप्पे ब्रम्हांड व अथांगता यांचा अध्यात्म दृष्टीने केल्या जाणारा अभ्यास म्हणजेच गुरूकडील ज्ञान, जे की, अखंड आहे.म्हणुन गुरूसुध्दा अनंत आहे हे सिध्द कारण ज्या अर्थी ज्ञान अनंत आहे, त्या अर्थी गुरूपण अनंत. कारण ज्ञान तर गुरूच निष्पादित करतो. म्हणुन गुरू अनंत आहे. गुरू आपल्या विद्यार्थ्यास ज्ञान देतो, मग विद्यार्थी त्या ज्ञानान भर घालून आपल्या शिष्यास देतो. अशा प्रकारे ज्ञान हे अखंड राहते व ते वाढत जाते. इतक्याच मला आणखी दोन प्रश्नांची उत्तरे सापडली.

आता मी एका दुसऱ्या प्रश्नाकडे वळलो, की गुरूकडे असलेले ज्ञान विद्यार्थ्यांनी कसे प्राप्त करावे? आता येथे विद्यार्थ्याचा प्रत्यक्ष संबध येतो. विद्यार्थी एक मातीचा घडा आहे. याला घडविणारा कुंभार म्हणजे शिक्षक असतो. आणि या घड्यामध्ये भरायचे पाणी म्हणजे ज्ञान, परंतु येथे विद्यार्थ्याला घड्याची उपमा देणे अयोग्य ठरेल. मग? मी आता त्याला एका हिऱ्याची उपमा देतो ज्यामध्ये हिऱ्याला चमकविण्यासाठी त्याला पैलु पाडावे लगतात.ज्यासाठी लागणारा हातोडा ज्ञानरूपी, तर जवाहिर गुरू आहे.

आता मी विद्यार्थ्याला चकोराची उपमा देईल. ज्या मध्ये चंद्र म्हणजे एक गुरू व चांदणे म्हणजे ज्ञान. घडा,हिरा व चंद्र झाल्यानंतर मी शिष्याला एका रोपट्याची उपमा देईल. ज्यामध्ये गुरू म्हणजे माळी तर त्या रोपट्याला द्यावयाचे पाणी म्हणजे ज्ञान आहे. परंतु मला विद्यार्थ्याला एवढ्या उपमा द्यावयाची गरज का पडली? तर दिलेल्या उपमांमध्ये प्रत्येक ठिकाणी ती वस्तु घडवण्याची पध्दत वेगवेगळी आहे. अगदी त्याचप्रमाणे विद्यार्थ्याला ज्ञान देण्यासाठी वेगवेगळ्या पध्दती गुरूला वापराव्या लागतात.



Scanned by CamScanner

मी दिलेल्या उपमांमध्ये पहिली उपमा आहे घडा. घडा घडवितांना कुंभार आधि त्या घड्याला सावकाश आकार देतो व नंतर तो भाजताना त्यावर सक्ती वापरतो. अगदी त्याचप्रमाणे काही विद्यार्थी असतात. ज्यांना प्रथम समजावून नंतर सक्ती वापरावी लागते.

आता दिलेल्या उपमांपैकी दुसरी उपमा हिरा आहे. हिरा घडवताना जवाहीर त्या हिऱ्याला सुरूवातीपासूनच घाव घालतो. अगदी त्या प्रमाणे काही विद्यार्थ्यांना सुरूवातीपासुनच सक्ती करावी लागते.

तिसरी दिलेली उपमा आहे चकोर. चकोराला चांदण्याची भूक लागते जे की चंद्र पुरवीत असतो अमावस्या या दिवशी ती इच्छा पुर्ण होऊ शकत नाही. अगदी त्याचप्रमाणे काही विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छा पुर्ण करून ज्ञानदान करावे लागते; परंतु काही वेळा त्या इच्छा पुर्ण करणे हे धोक्याचे असते म्हणुन काहीवेळा शिक्षक विद्यार्थ्यांच्या इच्छा पुर्ण करत नाहीत.

माझी शेवटची उपमा एका रोपट्याची होती, रोपट्याला मात्र आयुष्यभर वाढवल्या जाते त्या प्रमाणे काही विद्यार्थ्यांना नेहमी प्रेमानेच शिक्षित करावे लागते. शिक्षक या सर्व मार्गांमधुन विद्यार्थ्यांना शिक्षित करतात परंतु त्यामागचा त्यांचा उद्देश एकच असतो की त्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल गोडी निर्माण व्हावी. मग जर शिक्षक विद्यार्थ्यांसाठी एवढे काही करतात तर मग विद्यार्थ्याने तर थोडे प्रयत्न केलेच पाहिजेत. ज्ञान फक्त गुरूच देऊ शकतो म्हणुन मी म्हणेन की विद्यार्थ्यांनी एकच लक्षात ठेवावे

**'' ज्ञानाचा तो एक गुरूच त्वष्टा**
**ठेवा तयावरी निष्ठा**
**गुरूभक्तीची पराकाष्ठा**
**एकलव्याचियेपरी''।।**

या चारोळीमध्ये मला एवढेच सांगायचे आहे की, ज्याप्रमाणे महाभारतामध्ये एकलव्याने गुरूभक्ती केली त्याचप्रमाणे आपणही त्या गुरूची भक्ती करायला हवी. एका गुरूला कसा भक्त, शिष्य, प्रिय आहे, नव्हे नव्हे स्वयं भगवंताला सुध्दा कसा भक्त प्रिय आहे, तर भगवंतांनीच गीतेच्या बाराव्या अध्यायात सांगितले आहे की,



Scanned by CamScanner

**संतुष्टःसततं योगी यतात्मा दृढ निश्चयः मय्यर्पितमनोबुध्दीर्यो मद्भक्तः स मे प्रियः ।।**

या श्लोकामध्ये भगवंत असे प्रतिपादन करतात की जो भक्त संतुष्ट, सतत योगलीन राहणारा, सन्यासाचे ऱ्हदय, बाळगणारा आणि दृढनिश्चयी, असा भक्त त्या परमेश्वराला खुप आवडतो, ते एका गुरूला न आवडणे हे अशक्य आहे म्हणुन शिष्याने वरील नमुदित संस्कार आपल्या आत्म्यावर बिंबवावेत मग गुरू आणि शिष्य एक आत्मा बनतील.

एक शिष्य कसाही गुरूकडे गेला तरी गुरू त्या शिष्याला अंगीकारतो. याचे प्रमाण आपल्या माऊली देतात–

**जैसा स्वभावो मायबापांचा ।**
**अपत्य बोले जरी बोबडी वाचा ।**
**तरी अधिकची तयाचा ।**
**संतोष आथी ।।**
**तैसा तुम्ही मी अंगीकारीला ।**
**सज्जनी आपुला म्हणीतला ।**
**तरी उणे सहजी उपसाहला**
**प्रार्थुकाई ।।**
**(श्री ज्ञानेश्वरी अध्याय–१ ओवी क्र.६४ व ६५)**

वरील ओवीमध्ये माऊली म्हणतात की, मायबापांचा स्वभाव कसा असतो की आपले लेकरू कितीही बोबडे बोलले तरी त्यांना ते गोड वाटते. अगदी त्याचप्रमाणे गुरू आपल्या शिष्याला कोणत्याही अवस्थेत स्विकारतो.

●●●



Scanned by CamScanner

म्हणुन विद्यार्थ्याने काय करावे की,वरील ओवीमध्ये माऊली म्हणतात की, मायबापांचा स्वभाव कसा असतो की आपले लेकरू कितीही बोबडे बोलले. तरी त्यांना ते गोड वाटते. अगदी त्याचप्रमाणे गुरू आपल्या शिष्याला कोणत्याही अवस्थेत स्विकारतो.

म्हणुन विद्यार्थ्याने काय करावे की,

**म्हणोनी जाणतेन गुरू भजिजे ।**
**तेणे कृतकार्य होईजे ।**
**जैसे मुळसिंचने सहजे ।**
**शाखापल्लव संतोषती ।।**
**(श्री ज्ञानेश्वरी अध्याय ०१ ओवी क्र.२५)**

ओवीमध्ये कैवल्यज्योती म्हणतात की जर गुरूला प्रात करायचे आहे तर फक्त . आपल्या गुरूला शरण जा. गुरू आपोआप तुम्हाला हा संसाररूपी जलधि पार करवेल.

संत एकनाथ महाराज आपल्या अभंगात सांगतात की,

**''गुरू परमात्मा परेशु**
**ऐसा ज्याचा दृढविश्वासु ।।**
**देव तयाचा अंकिला ।**
**स्वयं संचरा त्याचे घरा ।।**
**एका जनार्दनी गुरूदेव ।**
**येथे नाही बा संशय ।।''**

अभंगामध्ये महाराज सांगतात की, गुरू परमात्मा आहे असा ज्याचा निश्चय असतो त्याच्या घरी स्वयं भगवंत नांदतो. म्हणून माझ्या प्रश्नाचे उत्तर ही आहे आणि विद्यार्थ्यांसाठी एक सल्ला ही आहे तो म्हणजे गुरूला प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्याने केवळ गुरूजी भक्ती करावी.

आता प्रश्न समोर आला की गुरू काय आहे. तर थोडा विचार केल्यावर माझ्या लक्षात आले, की या प्रश्नाचे उत्तर तर केवळ चार गुरूपरंपरेच्या श्लोकांमध्ये आहे. ते श्लोक असे.



Scanned by CamScanner

''गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णू गुरूर्देवो महेश्वरा ।
गुरू:साक्षात् परब्रह्म: तस्मै श्री गुरवे नमः''।।
अज्ञान तिमिरांधस्य, ज्ञानार्जन शलाकायां ।।
चक्षुरं मिल्लितं येन तस्मै ।।२।।
मन्नाथ श्री जगन्नाथ मुद्गुरू श्री जगद्गुरू ।
ममात्मा सर्व भूतात्मा तस्मै ०।।३।।
अखंड मंडलाकार व्याप्तं येन चराचरम्
तत्पाद् स्पर्शितम् येन तस्मै ०।।४।।

या चार श्लोकांपैकी पहिल्या श्लोकाचा अर्थ असा आहे की गुरू हा ब्रम्ह,विष्णू रूद्र या ईश्वराच्या तिन्ही स्वरूपामध्ये विद्यमान असून तो परब्रम्ह्म आहे. म्हणजेच देव व गुरू एकच!

दुसऱ्या श्लोकामध्ये सांगितले आहे की, गुरू ही ज्ञानाची शलाका आहे की जिच्यामुळे अज्ञानांध असलेल्या विद्यार्थ्यास ज्ञानदृष्टी प्राप्त होते.

तिसऱ्या श्लोकामध्ये म्हटले आहे की हे गुरू तू माझा गुरू पण आहे आणि जगाचा गुरू पण आहे. तू माझी आत्मा आहे आणि जगाची आत्मा आहे. म्हणजेच जग हे गुरूमध्येच विद्यमान आहे आणि हे ज्ञान सिंधु गुरू तु या अखंड ब्रम्हांडामध्ये पूर्ण पणे व्याप्त आहे किंवा हे ब्रम्हांड तुझ्यामध्ये स्थित आहे असा चौथ्या श्लोकाचा अर्थ आहे.

या चारही श्लोकांच्या शृंखलेचा विचार केला असता या श्लोकांचे सार लक्षात येते ते असे की गुरू परमात्मा आहे आणि तो ज्ञानाची एक अशी शलाका आहे की, जिने अज्ञानांध शिष्य गुरूच्या अखंड स्वरूपाला पाहू शकतो आणि हेच माझ्या प्रश्नाचे उत्तर आहे.

पुढचा प्रश्न होता की, गुरूची सुरूवात कोठुन आहे? तर गुरूची सुरूवातही नाही आणि अंतही नाही. गुरू सर्वव्यापी आहे, गुरू ज्ञानाचा प्रकाशपुंज सुर्य आहे, गुरू परमात्मा आहे, गुरु अनंत आहे, गुरूची व्याख्या करणे असंभव आहे. गुरूला पूर्ण शरण जाणे एवढेच शक्य आहे. हेच या प्रश्नाचे उत्तर आहे.



Scanned by CamScanner

आता मी पुढचा प्रश्न म्हणजेच एका गुणी विद्यार्थ्याच्या शोधात लागतो. आपल्या भारतीय गुरू शिष्य परंपरमध्ये अशी अनेक श्रेष्ठ गुरू–शिष्यांची उदाहरणे आहेत. त्यामध्ये शिष्यात आघाडीवर असणारा एकलव्य गुरूभक्ती धनुर्विद्येमध्ये सगळ्यात आवश्यक अंगठा, जेव्हा गुरू द्रोणाचार्यांनी मागितला तेंव्हा तोही त्याने आपल्या गुरूला दिला.

आणखी एक उदाहरण माझ्यासमोर आहे ते म्हणजे नवनाथांपैकी एक गोरक्षनाथ गोरक्षनाथांनी आपले गुरू मच्छींद्रनाथ यांची अपार सेवा केली. अशी अनेक उदाहरणे आपल्याला देता येतील परंतु नुसती उदाहरणे देऊन चालणार नाही, तर ती उदाहरणे त्या शिष्यांचे गुण आपल्याला आचरावे लागतील. गुरूभक्ती, हाच एक धर्म शिष्याने आचरावा. गुरूला पुर्णपणे शरण जाऊन आपण आपल्या स्वतःला त्या गुरूच्या पायांवर समर्पित करावे. पृथ्वीवर जर त्या परमेश्वराचा शोध घ्यायचा असेल तर गुरूला शरण जा. तोच तुमच्यासाठी ईश्रवर आहे. गुरू कैवल्यसागर आहे. आपल्या सर्व इच्छा कामना यांचा त्याग गुरूच्या चरणांवर करावा. विद्यार्थ्याने एवढे लक्षात ठेवावे, की गुरू हा तुम्हाला सर्व काही देऊ शकतो, एका विद्यार्थ्याने आपल्या इच्छा पुर्ण करण्यासाठी स्वैर भटकू नये तर आपल्या गुरूला त्या इच्छा समर्पित कराव्यात.

एका गुणी विद्यार्थ्याला ध्यानी–मनी–स्वप्नी आपल्या गुरूचे आणि आपल्याला त्यांच्याकडून काय घ्यायचे आहे याचेच स्मरण असते. गुणी विद्यार्थ्यामध्ये कोणते गुण असतात? तर विद्यार्थ्यामध्ये पुढील 'वि' गुण आवश्यक आहेत ते म्हणजे,

विश्वास, विनम्रता, विचार, विवेक, विद्या, आणि विकास.

वरील 'वि' पैकी पहिल्या दोन गोष्टी तर अतिशय महत्वाच्या आहेत कारण आपल्या गुरूबद्दल विश्वास व विनम्रता असेल तर विद्यार्थ्यामध्ये 'स' विचार येतात विचार आले की 'विवेक' येतो. विवेकातून विद्या प्राप्त करण्याची शक्ती मिळते आणि या सर्वामधुनच विद्यार्थ्याचा 'विकास' होतो म्हणुन या गोष्टी आचरल्या पाहिजेत ज्याप्रमाणे सहा 'वि' आचरले पाहिजेत त्याचप्रमाणे सहा 'वि' त्यागल्या पाहिजेत ते म्हणजे –



Scanned by CamScanner

विलास,विस्मरण,विनाश.विध्वंस,विकृती,विकार, या गोष्टी त्यागाव्यात सहा 'वि' आचरणे व सहा वि त्यागणे हे आपल्या जिवनात 'वि षट' सुत्री या सुत्राने लक्षात ठेवावे. कोणत्याही विद्यार्थ्यांसाठी विषट सुत्री आचरणे अतिशय महत्वाचे आहे.

गुणी विद्यार्थी कसा असावा हे कळताच माझा शोध शिक्षक आणि विद्यार्थी यातील संबंधाचा सुरू झाला. या प्रश्नासाठी मी आधी उत्तर लिहीतो आणि मग ते उत्तर कसे आले ते सांगतो.

तर उत्तर असे आहे की शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संबंध म्हणजेच जीवन होय.

आता मी तुम्हाला जे सांगणार आहे, त्यावर लक्ष केंद्रीत करा, विशेषतः हे विद्यार्थ्यासाठी आहे. ऐका आणि वाचा. तर शिक्षक ब्रम्हांड आहे, आणि ब्रम्हांड म्हणजेच काय हे समजून घेणे आवश्यक आहे. त्या योगे आपण शिक्षकाला, शिक्षकाच्या स्वरूपाला समजु शकतो. तर ब्रम्हांड हि एक अनंत गोष्ट आहे, असे मानवी बुध्दी सांगते म्हणजेच शिक्षक सुध्दा अनंत. आता शिक्षक अनंत कसा, याचे स्पष्टीकरण आपण पाहिले आहे. एवढेच लक्षात ठेवले पाहिजे की, विद्यार्थी आणि शिक्षक एकच आहेत, कारण एक विद्यार्थी म्हणजे कोणाचा तरी शिक्षकच. म्हणून ब्रम्हांड म्हणजे शिक्षक आणि विद्यार्थी. त्या अर्थी ब्रम्हांडातील प्रत्येक गोष्टसुध्दा शिक्षक आणि विद्यार्थी.

आपण जर मानवी बुध्दीचा विचार केला तर समजते, की मानवासाठी या सृष्टीवरील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे जीवन होय.म्हणुन मानवी बुध्दीप्रमाणे या पृथ्वीवर शिक्षक आणि विद्यार्थी म्हणजेच जीवन असे म्हणता येईल,कारण या ब्रम्हांडातील प्रत्येक गोष्ट म्हणजेच शिक्षक आणि विद्यार्थी जीवन हे किंवा जीवनसृष्टीही ब्रम्हांडाचाच एकभाग आहे, म्हणुन मानवाप्रमाणे शिक्षक आणि विद्यार्थी म्हणजे जीवन होय. कारण कोणताही व्यक्ति किंवा मानव एक तर गुरू किंवा मग शिष्य असतो. तर हा झाला शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संबंध.

आता मी शेवटचा प्रश्न ''जलधी'' म्हणजे काय याच्या शोधात लागतो तर जलधि म्हणजे काय आणि गुरूला जलधि म्हणण्यामागील काय कारण आहे, तर



Scanned by CamScanner

जलधि हा एक जीवनासागर आहे. ज्या जीवनात तरून जाण्यासाठी कर्मयोग ही होडी. ला लागणारे वल्हे ज्ञानयोग आहे व यामध्ये येणाऱ्या लाटा सुख व दुःखाच्या या सारख्या आहेत.

सर्वात महत्वाचे म्हणजे या होडीला हाकण्यासाठी जो नावाडी लागतो तो म्हणजे गुरू असतो आणि या नावेत बसण्यासाठी ज्या ज्या योग्यता एका साधकाला असाव्या लागतात त्यांचा जो तर्कशुध्द अभ्यास आहे तोच आहे 'जलधि'

या अभ्यासात सर्वात आवश्यक अशी साधकाची योग्यता म्हणजे 'ज्ञानयोग' नुसते 'ज्ञान' आवश्य नाही तर 'ज्ञानयोगाला' साधणे एका साधकासाठी आवश्यक आहे. तर आता हा ज्ञानयोग काय आहे योग या शब्दाचा अर्थ आहे 'मीलन' तर आत्मा व परमात्मा यांचे 'मीलन' म्हणजे 'योग'होय हा 'योग' साधण्यासाठी यम,नियम,प्राणायाम, आसन इ.साधनांची आवश्यकता आहे. साधकाने साधनांच्या माध्यमातून साध्याची प्राप्ती करायची असते. येथे तर साधकाला असणारे साधन म्हणजे गुरूच आहे कारण एक गुरूच 'योग' या साधनाचा अर्थ यथारूपी आपल्या शिष्यास देत असतो आणि या साधनातून साध्य होते ते 'ज्ञान'. या ज्ञानाचा अर्थ जो पर्यत एका शिष्यास कळत नाही किंवा जोपर्यंत त्याला हे कळत नाही की, आपण या जीवनात कोणत्या कारणाने आलो आहोत व आपण काय करत आहोत. तो पर्यंत तो शिष्य एक अज्ञानी असतो याचे प्रमाण म्हणजे श्री माऊलीनी केलेल्या अज्ञानी माणसाच्या व्याख्या. माऊली म्हणतात–

**'' तो अज्ञान गा पांडवा ।**
**आणि तोही तोचि जाणा ।**
**जो इंद्रिये आव्हासावा ।**
**चारी एथ ।।**
**न करावे ते करी ।**
**असंभाव्य मनी धरी ।**
**चिंतु नये ते विचारी ।**
**जयाची मती ।।**



Scanned by CamScanner

नायकावे ते आईक

न बोलावे ते बके ।

परि दोष होतील ।

हे नदेखे प्रवर्तता ।।

न धरावा तो सगु

न लागावे तेथ लागु

नाचरावा जो मार्गु

आचरे जो ।।''(श्री ज्ञानेश्वरी)

या ओव्याचा स्पष्ट अर्थ एकच आहे की, ज्याचे आपल्या इंद्रियावर अंकुश नाही व जो आपल्या मनाचेच नेहमी एकतो व बुध्दीला मागे टाकतो तो व्यक्ति कधीही ज्ञानी बनु शकत नाही. एक इंग्लीश लेखक सांगतो की–

"Life is a race between your mind and the intelligency. that is the intelligency is not the part of mind and it is not part of someone's life it is just the property by which a man can beat his mind and get the orginal knowledge. otherwise we can't beat our mind or we do not try to beat our mind unless we active this property" हे त्याचे वाक्य माझ्या सततच्या स्मरणातील आहे. तो सांगतो ते खरेच आहे की, बुध्दीमत्ता ही मानवी जीवनाचा भागच नाही. ती केवळ एक संकल्पना आहे आणि जिचा विजय हाच मानवाला खरे ज्ञान प्राप्त करून देऊ शकतो. म्हणुन जेव्हा केंव्हा मन व बुध्दीचे द्वंद्व होईल तेव्हा फक्त बुध्दीचेच ऐकायला हवे; कारण बुध्दी ही स्थिर आहे व मन हे चंचल आहे. विज्ञानाच्या भाषेत सांगायचे झाले तर स्थितीपासुन मिळाणारी उर्जा ही साठवुन राहते व तिनेच कार्य घडते आणि कार्य घडनेच ज्ञानाचे मूळ आहे. आणि ज्ञान हेच कर्मयोगाचे सार आहे म्हणुन जो नेहमी बुध्दीचे ऐकतो तोच स्थितप्रज्ञ असतो व तोच एका गुरूवर पूर्ण विश्वास ठेऊन ज्ञानयोगाला प्राप्त करवतो. याचेच एक उदाहरण म्हणजे द्रोणाचार्य जेंव्हा धनुर्विद्या शिकवत होते तेंव्हा त्यांनी सर्व



Scanned by CamScanner

शिष्याची परिक्षा घेण्याचे ठरविले. झाडाच्या फांदीवर एक कृत्रिम पक्षी ठेऊन प्रत्येकाला त्याचे अक्षभेदन करण्यास बोलावले. आता प्रत्येकाला त्यांनी एक विचारले की संधान करताना तुम्हाला काय दिसते? तर त्यावर अज्ञानी म्हणजेच मन व भौतिक सृष्टीवर श्रध्दा ठेवणाऱ्यांनी वेगवेगळी उत्तरे दिली. काहींनी फांदी दिसते असे सांगितले काहींनी पक्षी दिसतो असे सांगितले पण फक्त अर्जुनानेच सांगितले की मला फक्त पक्ष्याचा डोळा दिसत आहे कारण त्याचा फक्त आणि फक्त बुध्दीवर विश्वास होता आणि म्हणूनच भगवंतानी सुध्दा त्यालाच भगवत्‌गीता प्रत्यक्षात सांगितली. म्हणूनच ज्ञानयोग म्हणजेच पुरूषरूपी आत्मा व प्रकृतीरूपी बुध्दी यांचे मीलन होय.

एकदा ज्ञानयोग साधल्या गेला की कर्मयोगाला साधणे अवघड राहत नाही. परंतु कर्मयोग आणि ज्ञानयोग या दोन भिन्न गोष्टी आहेत. ज्ञानयोग सांगतो की योग करून मोक्षप्राप्ती किंवा ईश्वरप्राप्ती करावी आणि कर्मयोग हा कर्मप्रधान आहे भगवंत सांगतात की–

**'' लोके स्मिन्द्विविद्या निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।**
**ज्ञानयोगेन सांख्यानाम् कर्मयोगेन योगीनाम् ।।३।।''**

अर्थात कर्मयोगाची निष्ठा कर्मप्रधान असते, तर ज्ञानीयांची निष्ठा ज्ञानयोगात असते; परंतु या दोन्ही निष्ठा समकक्ष आहेत. कारण दोन्हीनीही भगवत्प्राप्तीच होणार आहे. या साठीच केवळ एक गुरू आपणास सांगु शकतो की कोणती निष्ठा महत्वाची ठरते. परंतु कलियुगामध्ये कर्म ही होडी जीवन सागराला पार करवू शकते आणि भगवंतसुध्दा सांगतात की, '**कर्मयोग विशिष्यते**'. कारण ज्ञानयोग हा कलियुगी व्यक्तिसाठी अतिशय कठीण व क्लेशकारक आहे. म्हणून हा कर्मयोग एका साधकाने आपल्या गुरूकडून यथार्थ समजुन घ्यावा. कारण कर्म म्हणजेच काही कर्मयोग नाही आणि त्यातही पुन्हा सकामकर्म व निष्काम कर्म हे येते. म्हणून कर्मयोग समजावून घेण्यासाठी मागे जे बुध्दीबद्दल सांगितले तेच योग्य ठरते. कारण काही जणांचा असा समज असतो की मनुष्य कर्माने नाही तर कर्मफळांच्या असक्तीने बांधल्या जातो. आसक्तरहीत कर्म जर केले तर मनुष्याला लक्षात येईल की,बांधल्या न जाता



Scanned by CamScanner

त्यास भगवत्प्राप्ती होते, यावर माऊली म्हणतात–

**म्हणऊनी तु नियतु । सकळ कामरहितु ।।**
**होऊनिया उचितु । स्वधर्मे रहाटे ।।१५०।।**
**जे रक्कते निष्कामिता । अनुसरले पार्था ।**
**ते कैवल्य तत्वता । पातले जगी ।।१५१।।**

म्हणुन आपल्या कर्माशी मानवाने चुकू नये व नुसते कर्म नाही तर कर्मयोग अभ्यासावा त्यासाठीच गुरूची आवश्यकता असते, कारण ज्याप्रमाणे माऊली म्हणतात **'गुरूविण अनुभव कैसा कळे'.** म्हणुनच माझ्यासमोर गुरू ही संकल्पना आल्यानंतर केवळ आणि केवळ समुद्र हीच कल्पना येते कारण जसा आपण या जीवनाच्या वेगवेगळ्या पैलुंशी असलेला संबंध आता अभ्यासला आहे त्याचप्रमाणे हे जीवन एका समुद्रासारखे आहे त्याच्या लाटांविषयी मी मागे वर्णन केले आहे ज्या सुख व दुःख यांच्या प्रतिक आहेत. सुख व दुःख हे टेलिव्हीजनवरील एक वाहीनी बदलुन दुसरे लावण्यासारखे आहे जे येणारच आहेत परंतु त्यासाठी प्रत्येक शिष्याने आत्मसंयम ठेवणे हे अत्यावश्यक आहे, कारण सुख व दुःख हे विषय आहेत जो विषयात अडकत जातो तो कदापीही गुरूच्या चरणी लागु शकत नाही व त्यास मोक्षप्राप्ती नाही. उदा. एकदा एक माणुस रात्री चालत घराकडे जात असताना त्याच्या मार्गात एक दोरी आली व तो त्या दोरीला सर्प समजुन भयभीत झाला व त्याला ऱ्हदय विकार होता म्हणून तो जागीच मृत पावला.

तो साप खरा होता का? तर नाही; परंतु केवळ विषयासक्त असल्या कारणाने त्यास मृत्युला सामोरे जावे लागले यावर संतश्रेष्ठ शांतीब्रम्ह एकनाथ महाराजांनी सुंदर भारूड केले आहे त्यात एक ओळ अशी आहे की, **"दोरीच्या सापा भिऊनी भवा, भेटी नाही जीवा शीवा"**, म्हणजेच जो पर्यंत माणूस या दोरीला सर्प मानत राहील तो पर्यंत त्यास जीवन, शीव म्हणजेच आत्मा, परमात्मा कळणार नाही व तो मोक्षप्राप्ती करू शकणार नाही, म्हणुन मी या जीवनाला एक 'जलधि' म्हटले आहे, आणि हे जीवनसुध्दा त्या सर्वव्यापी, सर्वशक्तीमान गुरूच्याच दिव्य स्वरूपाचा एक भाग आहे. मी त्या गुरूला ज्ञानजलधि असेच म्हणेल, शेवटी एकच म्हणेल की–



Scanned by CamScanner

''अभयं सत्त्वसंशुध्दिर्ज्ञानयोगव्यस्थिति
दानं,दमश्च यज्ञश्च साध्यायतप आर्जवम्''।।

बाकी हे जलधि चे एक पुष्प या एका खंडातून मी सद्गुरू चरणी अर्पण करतो *

।। श्री सद्गुरूंम् नित्यमहं नमामि ।।

'' येः पुज्यपादैः आचार्यैः एकम् अपि अक्षरम ।
प्रेम्णा अहं बोधितः तेषामऊ सर्वेषाम् चरणयोः ।
एतत् पुण्यं प्रथमं पुस्तकपुष्पम् समर्पितम् अस्तु ।।
(गुरूचरणांवर प्रथम पुस्तक पुष्प अपर्ण)

" ग्रंथनाम 'जलधि'
आचरीता येणे विधि ।
तात्काळची परमसिद्धी ।
साधकासी ।।

●●●



Scanned by CamScanner

# गुरूमाऊली

– कु.कल्याणी पाठक

नसे आस जगती दुजा कुणाची ।
गुरूमाऊली तीच, माझी साची ।।धृ।।

पडे एक शब्द मुखातुन त्यांच्या ।
तो वेद प्रामाण्य मानून साचा ।
जणु वाटते वाणी त्या ईश्वराची ।
गुरूमाऊली तीच माझीच साची ।।१।।

नयनांत त्यांच्या असे दिव्य तेज ।
परि करूणेचे भरे त्यांत ओज ।
असे आस मजसी त्या करूणेची
गुरूमाऊली तीच माझीची साची ।।२।।

पद् स्पर्शिता होतसे मन पावन ।
अशी गुरूमूर्ती असे मनभावन ।
वर्षते धारा कृपाशिर्वादाची ।
गुरूमाऊली तीच माझीच साची ।।३।।

जयांनी दिली ज्ञानरूपी सुधा ती ।
अन छत्रछाया ती वत्सलतेची ।
असे अतिप्रिय मुर्त सद्गुरूची ।
गुरूमाऊली तीच माझीच साची ।।४।।

करू शतशतदा चरणारविंदस्पर्श ।
रूप पाहता मनी होई हर्ष ।
असे ऱ्हदयी मम प्रतिमा तयांची ।
गुरूमाऊली तीच माझीच साची ।।५।।



Scanned by CamScanner

# परिशिष्ट

(पुस्तकातील अज्ञात शब्दांसाठी)

१) क्लेश – दु:ख

२) अव्यक्त – व्यक्त न करता येणारा

३) मतामस्मि – मी आणि मीच आहे

४) आथी – असतो

५) म्हणीतला – म्हणला

६) कृतकार्य – सत्कर्म

७) शाखापल्लव – फांद्या व पाने

८) परेशु – परमेश्वर

९) तिमिर – अंधार

१०) शालाका – किरण

११) चक्षू – डोळे

१२) आव्हासावा – भटकवतो

१३) मती– बुद्धी

१४) स्थितप्रज्ञ – स्थिर बुद्धीचा

१५) जलधि – समुद्र



Scanned by CamScanner

# पसायदान

आता विश्वात्मके देवें । येणे वाग्यज्ञे तोषावे
तोषोनि मज द्यावें । पसायदान हे ।।

जें खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ।।

दुरितांचे तिमीर जावो । विश्व स्वधर्मसुर्य पाहो
जो जे वांच्छिल तो ते लाहो । प्राणिजात ।।

वर्षत सकळमंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी
अनवरत भूमंडळी । भेटतु भुतां।।


चला कल्पतरूंचें आरव । चेतनाचिंतामणीचे गाव
बोलतें जे अर्णव । पीयुषांचे ।।

चंद्रमे जे अलांच्छन । मार्तण्ड जे तापहीन
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।

किंबहुना सर्वसुखी । पुर्ण होऊनि तिही लोकीं
भजि जो आदिपुरूखी । अखण्डित ।।

आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकी इये
दृष्टादृष्टविजये । होआवे जी ।।

येथे म्हणे श्रीविश्वेश्वराओ । हा होईल दान पसावो
येणे वरे ज्ञानदेवो । सुखियां जाला ।।



गुरूर्ब्रम्हा, गुरूर्विष्णू गरूर्देवो महेश्वरा ।
गुरू ः साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरूवेनमः ॥



Scanned by CamScanner

अनंतसंसारसमुद्रतार/
नौकायिताभ्याम स्थिर दाभ्याम/
जाड्यब्धिसंशोधन वाड.वाभ्याम/
नमो नमःश्री गुरूपादुकाभ्याम //

सरस्वती प्रकाशन, वालूर

Scanned by CamScanner